I.O.

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** जुना राजवाडा
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0623 **Year (वर्ष):** 2024
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**09/10/2024 17:09

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 11/10/2023
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 11/10/2023
**Time From (वेळेपासून):** 16:35 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:18 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 09/10/2024 **Time (वेळ):** 17:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 028
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 09/10/2024 17:00 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** 852/8 बी वर्ड, रघूकुल बिल्डीं,सुभाष रोड, कोल्हापूर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री.प्रमोद प्रभाकर लिगाडे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1969

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पाचगांव रोड,संभाजीनगर, ,जुना राजवाडा,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पाचगांव रोड,संभाजीनगर, ,जुना राजवाडा,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9922819911

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विकास रोहीदास सोनवणे | | | 1. प्रतिभानगर कोल्हापूर,जुना राजवाडा,कोल्हापुर,महाराष्ट्र, भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक. 09/10/2024
मी श्री.प्रमोद प्रभाकर लिगाडे, वय-55 वर्षे ,व्यवसाय-बेकरी उद्योग,रा.शिंदे आंगण,पाचगांव रोड,संभाजीनगर, कोल्हापूर मो.नं.9922819911 समक्ष हजर राहून फिर्याद लिहून देतो की,

मी वरील पत्यावर माझे कुटुंबासोबत एकत्रीत राहण्यास आहे. माझा गारगोटी रोड,कोल्हापूर येथे अंबिका बेकर्स नावाचा बेकरी व्यवसाय आहे. दि.10/10/2023 रोजी श्री.सोनवणे, अन्न सुरक्षा अधिकारी, कोल्हापूर व त्यांच्यासोबत त्यांचा एक सहकारी सकाळी 11.00 वा. सुमारास माझे अंबिका बेकर्स या बेकरीमध्ये आले होते त्यावेळी माझ्या मुलाने त्यांचे माझेशी फोनवर बोलणे करून दिले. श्री.सोनवणे यांनी सांगीतले की, त्यांनी बेकरीमधील काही सॅम्पल्स घेतले आहेत तुम्ही सदर ठिकाणी ताबडतोब या. त्यावर मी आईला दवाखान्यात घेवून आलो आहे, तेव्हा थोडा वेळ दया असे सांगीतले. तेव्हा त्यांनी मी दुपारी पुन्हा येतो असे सांगीतले. मी दुपारी.4.00 वा.चे सुमारास बेकरीमध्ये असताना श्री. सोनवणे व त्यांचा आणखी एक सहकारी असे बेकरीत आले. त्यावेळी आम्ही बेकरी मध्ये तयार केलेले खारी, ब्रेड, टोस्ट इत्यादी सॅम्पल घेतले आहेत तुमच्यावर कारवाई करणार तुम्ही काय करणार सांगा असे विचारले त्यावेळी मी त्यांना म्हणालो साहेब काय करायचे ते तुम्हीच सांगा. त्यावेळी त्यांनी दर सहा महिन्यासाठी 15,000/- रूपये दयावे लागतील असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना 10,000/- रूपये देतो असे म्हणालो असता त्यांनी माझेकडे तडजोड करून 15,000/-रूपये मागणी केली. मी त्यांना उदया भेटतो असे सांगीतले. त्यानंतर ते माझ्या बेकरीमधून निघून गेले.

श्री.सो◌ेनवणे हे माझेकडे मागत असलेले 15,000/- रुपये हे लाच म्हणुन मागत असल्याची माझी खात्री झाली. त्यांचे मागणी प्रमाणे 15,000/-रुपये लाच देण्याची माझी इच्छा नसल्याने मी दि.11/10/2023 रोजी त्यांचे विरुध्द श्री.सरदार नाळे,पोलीस उपअधीक्षक, अ◌ॅन्टी करप्षन ब्युरो कोल्हापूर यांचेकडे प्रत्यक्ष हजर राहून वरील प्रमाणे तक्रार सांगितली. तसेच मी दिनांक 11/10/2023 रोजी त्यांना भेटण्यास जाणार असुन त्यांचेवर योग्य ती कारवाई व्हावी म्हणुन माझा तक्रारी अर्ज त्यांचेकडे दिला. मी दिले अर्जावर कारवाईसाठी नाळे साहेब यांनी मा. जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था करवीर कार्यालय कोल्हापूर कार्यालयाकडुन दोन षासकिय पंचांना बोलावुन घेतले होते. तसेच त्यांचे कार्यालयातील सापळा पथकासाठी अमंलदार बोलावुन घेतले त्यानंतर त्यांचेषी तसेच पंचांषी माझी ओळख करुन देवुन मला माझी तक्रारी पंचांना सांगणेस सांगितली. मी दिलेल्या तक्रारी अर्जावर नाळे साहेब तसेच दोन्ही पंचांनी सहया केल्या. त्यानंतर नाळे साहेब यांनी पुढील कारवाई अ◌ॅन्टी करप्शन ब्युरोचे ऑफीसमधुन करण्याचे आहे असे सांगुन त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डरची संपुर्ण माहिती आम्हांला देवुन अन्न व औषध प्रशासन विभागातील सोनवणे साहेब यांच्या लाच मागणीचे अनुषंगाने सर्वांना पडताळणी बाबत आवश्यक सुचना दिल्या. त्यावेळी नाळे साहेबांनी दिले सुचनेवरून मी सोनवणे साहेब यांना माझे मोबाईल क्रमांक 9922819911 वरुन सोनवणे साहेब यांचा मोबाईल नंबर 8888994683 वर 16.20 वा. कॉल करुन त्यांचेशी बोलणे झाले त्यावेळी कुठे येवू मग....असे मी विचारले. त्यावर ऑफीसला या.... असे सोनवणे यं◌ानी सांगीतले. त्यावर मी ठिक आहे पंधरा वीस मिनीटांत येतो मग साहेब ...असे सांगीतले. त्यानंतर पुन्हा नाळे साहेबांनी आवश्यक त्या सुचना देवुन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर 16.35 वा. च्या सुमारास चालु करुन देवून मला व पंच नं01 थैल यांना अन्न निरीक्षक सोनवणे यांची भेट घेण्यासाठी अन्न व औषध प्रशासन विभाग,कोल्हापूर येथे जाणेस सं◌ागितले त्यावेळी मी माझेकडील इलेक्ट्रीक मोटर सायकल क्रमांक डभ्.09.ळम्.9911 वरुन अन्न व औषध प्रशासन विभाग कोल्हापूर कार्यालयात गेलो . तेथे एका कक्षात अन्यधान्य निरीक्षक, सोनवणे बसलेले होते. त्यांनी माझेकडे पाहून बोला.....असे बोलले. त्यावेळी मी त्यावर हं काय नाय दुपारी येतो म्हणालो बारा एक वाजता येतो काल आपल बोलणं झाल होत....असे म्हणालो त्यावेळी सोनवणे त्यावर हो झालेलं...असे म्हणाले त्यावेळी माझेत व त्यांचेत माझे आईचे आजारपणाबाबत बोलणे झाले. त्यावेळी मी सोनवणे साहेबांना त्यावर जे काल आपलं बोलणं

झालं होत ते.....असे बोललो. त्यावेळी सोनवणे हुं मग....असे म्हणाले. त्यावेळी मी ते जरा अॅडजेस्टमेंट तेवढं.... असे म्हणालो. त्यावेळी सोनवणे त्यावर आता किती अॅडजेस्टमेंट करायची असे सोनवणे बोलले त्यावेळी मी तरी जरा बघा साहेब.....असे म्हणालो. त्यावेळी सोनवणे त्यावर किती सांगीतलेलं तुम्हाला....असे म्हणाले. त्यावेळी मी त्यावर तुम्हीच सांगीतले होत की काल तुम्ही पंधरा म्हटला होता ना साहेब....असे म्हणालो. त्यावेळी सोनवणे त्यावर आता काय अॅडजेस्टमेंट करायची तुम्हीच सांगा मी पंचवीसच पंधरावर आलोय पंचवीस पंधरा होत नाही वीस नाही सांगीतल....असे म्हणाले. त्यावेळी मी हं...असे म्हणालो. त्यावेळी सोनवणे बरोबर आहे तस पंधरावर आलोय मग अस नाही केलं नाही पाचशे रूपये कमी करा पाचशे कमी करा अस नाही डायरेक्ट तुम्हाला ते सांगीतलं ती योग्य आहे त्याच्यामध्ये....असे म्हणाले. त्यावेळी मी चालेलं....असे म्हणालो. त्यावेळी सोनवणे कालच तुम्हाला बोललो मी तेवढं असले तर घेवून या एवढचं....असे म्हणाले. त्यावेळी मी काय झालं आज सकाळी अॅडजेस्टमेंट केली पण दवाखान्यात वेळ लागलेला... असे म्हणालो. त्यावेळी सोनवणे हं....असे म्हणाले. त्यावेळी मी म्हणून जाता जाता भेटूया मग आज कॅश जमा होते काऊंटरला कॅश जमा होते....असे म्हणालो त्यावेळी सोनवणे बर...असे म्हणाले त्यावेळी मी उदया सकाळी दहा वाजता तुम्हाला देतो मी...असे म्हणालो. त्यावेळी सोनवणे बर ठिक आहे....असे म्हणाले. त्यावेळी मी हं दहा वाजता कुठं इथं येवू का...असे म्हणालो. त्यावेळी सोनवणे इथचं या फोन करा आजचया सारखं हुं....असे म्हणाले. त्यावेळी मी चालेल चालेल थॅन्क्यु सर... असे म्हणालो त्यानंतर तेथुन मी व पंच नं. 1 असे परत अॅन्टी करप्शन ऑफीस येथे येवुन नाळे साहेब यांना घडलेली हकीकत सांगितली मी दुसरे दिवशी पैसे घेवुन सोनवणे यांना भेटणार असल्याने चालु कारवाई नाळे साहेबांनी स्थगीत करून सर्वांना गोपनियता राखणेबाबत सुचना करून दिनांक 12/10/2024 रोजी सकाळी 10.00 वाजता ऑफीसला येण्यास सांगितले.

दि.12/10/2023 रोजी मी अॅन्टी करप्शन ऑफीस कोल्हापूर येथे नाळे साहेबांची भेट घेतली त्यावेळी पंच व सापळा पथक हजर होते. त्यावेळी नाळे साहेबांनी सापळापुर्व व सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना देवून मला पंचासमक्ष श्री सोनवणे हे कोठे आहेत हे पाहण्यासाठी त्यंाना फोन करण्यास सांगितले. त्यावेळी मी नाळे साहेबांना म्हणालो की, आता सोनवणे साहेब यांना फोन करायला नको, मला आता अत्यंत अस्वस्थ वाटत असून मी तणावाखाली असल्याने मी सोनवणे यांच्याकडे पडताळणी करता जाणेबाबत असमर्थता दर्शवली. तसेच दि. 11/10/2023 रोजी पडताळणी कारवाई मध्ये श्री.सोनवणे यांनी माझेकडे मागणी केलेले 15,000/- रूपये हे श्री सोनवणे यांनी दिनांक 11/10/2023 रोजीच रात्री 09.30 वा चे सुमारास माझे बेकरीमध्ये येवुन माझा मुलगा प्रतिक लिगाडे वय-26 वर्षे याचेकडून घेवून गेले आहेत असे सांगितले.

त्यावेळी मी नाळे साहेबांना सांगितले की, सोनवणे साहेब यांनी माझेकडे प्रथम मागणी करताना 25,000 /- रूपयांची मागणी केली होती जरी माझे मुलाकडून 15000/- रुपये घेवून गेले असले तरी ते पुन्हा माझेकडे राहिलेले 10,000/- रूपये हे मागणी करून घेवून जाण्याची शक्यता आहे. त्यावेळी त्यांचेवर पुढील कारवाई करावी असे मी सांगितले. त्यामुळे नाळे साहेबांनी चालु कारवाई स्थगित करून सोनवणे साहेब यांनी माझेशी संपर्क केल्यास त्यांना कळविणेबाबत तसेच गोपनियता राखणेबाबत सुचना दिल्या.

त्यानंतर दरम्यानच्या काळात अन्न सुरक्षा अधिकारी, श्री.सोनवणे हे माझे बेकरी मध्ये आले नाहीत किंवा त्यांनी माझे कडे प्रत्यक्ष पैशाची मागणी केलेली नाही. अगर त्यांचे मार्फत अन्य कोणी व्यक्तीने पैशाची मागणी केलेली नाही. त्याबाबत मी व नाळे साहेब एकमेकांचे संपर्कात असलेने त्याबाबत मी त्यांना माहिती देत होतो व सोनवणे साहेब हे संपर्क करण्याची शक्यता असलेबाबत सांगत होतो.

दि.21/08/2024 रोजी वर्तमान पत्रामध्ये बातमी वाचून समजले की, आपलेकडल अन्य तक्रारीवरून अन्न सुरक्षा अधिकारी, श्री.सोनवणे यांचेवर सापळा कारवाई केली आहे. त्यावेळी मी अॅन्टी करप्शन ब्युरोमध्ये सदरबातमीची खात्री केली असता मला समजले की, आपलेकडील तक्रारदार यांचे तक्रारीवरून सापळा कारवाई होवुन अन्न सुरक्षा अधिकारी, श्री.सोनवणे यांना पकडले असुन त्यांचेवर जुना राजवाडा पोलीस ठाणे येथे गु.र.नं. 550/2024 भ्रष्टाचारप्रतिबंध अधिनियम 1988 कलम 7 प्रमाणे गुन्हा दाखल आहे. श्री सोनवणे यांचे पुर्ण नाव श्री.विकास रोहीदास सोनवणे, अन्न निरीक्षक, अन्न व औषध प्रशासन विभाग, कोल्हापूर असे असल्याचे समजले. श्री.सोनवणे यांचेवर अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात तक्रारदार यांनी दिले तक्रारीवरून अन्न सुरक्षा अधिकारी, श्री.सोनवणे यांची दिनांक 11/10/2023 रोजी सापळा कारवाई केली असल्याने तसेच अन्न सुरक्षा अधिकारी, श्री.सोनवणे यांची दिनांक 11/10/2023 रोजी पडताळणी कारवाई झालेनंतर ते माझे बेकरी मध्ये आले नाहीत किंवा त्यांनी माझे कडे प्रत्यक्ष पैशाची मागणी केलेली नाही. अगर त्यांचे मार्फत अन्य कोणी व्यक्तीने पैशाची मागणी केलेली नाही. त्यामुळे सोनवणे साहेब हे माझेकडून लाचेचे पैसे स्वीकारणार नाहीत याची मला आता खात्री झाली आहे.

तरी दि.11/10/2023 रोजी माझे अंबिेका बेकर्स या बेकरीतील सॅम्पल तपासून त्यावर कारवाई न करणेसाठी

श्री सोनवणे यांनी माझेकडे अप्रामाणीकपणे स्वतःचे फायदयाकरीता बेकायदेशिरपणे 25,000/- रूपयांची मागणी करून तडजोडीअंती माझेकडे 15,000/- रूपयांची लाचेची मागणी केली आहे म्हणून श्री. विकास रोहीदास सोनवणे,अन्न सुरक्षा अधिकारी, अन्न व औषध प्रशासन विभाग, कोल्हापूर याचेविरूध्द माझी फिर्याद आहे.
माझा वरील जबाब मी सांगितले प्रमाणे संगणकावर टंकलिखित केलेला असून तो मी वाचून पाहिला असता बरोबर आहे.

समक्ष हा दिला जबाब स. ता. म.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
SANJEEVKUMAR DATTARAYA ZADE(I (Inspector)) / 14601000450SDZM7601Y **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची सही)

पोलीस ठाणे अंमलदार
लाच लुचपत प्रतिबंधक विभाग ... पोलीस ठाणे, कोल्हापूर